# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक ०१.०८.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ३१.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०९ ईसमावर कारवाई करून एकुण ४७,२५,२७००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केस मध्ये ११ इसमांवर कारवाई करुन ७३,९३०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,३७८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०९,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ३१.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०१.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— लुडो किंग गेमद्वारे जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३१.०७.२०२६ चे २०.१५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत वनदेवी नगर चौक, सार्वजनिक ठिकाणी रोडचे बाजुला काही ईसम लुडोचे गेमवर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळत आहेत. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून तेथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, आरोपी क्र. १) अब्दुल कलाम अब्दुल करीम, वय ४४ वर्षे, रा. संजीवनी क्वॉर्टर, यशोधरानगर २) शेख अश्पाक शेख गफुर, वय ५४ वर्षे, रा. बंदे नवाज नगर, यशोधरानगर ३) शेख अकरम शेख उस्मान, वय ४४ वर्षे, रा. संजीवनी क्वॉर्टर, यशोधरानगर ४) शेख मोहसिन शेख ख्वाजा, वय ३६ वर्षे, ५) शेख अयुब शेख गफ्फार कुरेशी, वय ३७ वर्षे, दोन्ही रा. माजरी, शिवनगर, ६) मोहम्मद शाहीद आलम मोहम्मद ईस्तीयाक आलम, वय ४४ वर्षे, रा. योगी अरविंद नगर, यशोधरानगर, ७) करीम शहा सलाम शहा, वय २६ वर्षे, रा. वनदेवी नगर झोपडपट्टी, यशोधरानगर, नागपुर हे मोबाईलच्या माध्यमातुन लुडो किंग या गेमवर पैश्याची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख २,२००/—रू., लुडो प्रिंट असलेला फोटा फ्रेम व ०७ मोबाईल फोन असा एकुण ५२,३९०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख, पोहवा. गणेश गुप्ता, अमोल, पोअं. लक्ष्मण पडवाल व रितेश दुधे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे भांडेवाडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०७.२०२६ चे १५.३० वा. ते दिनांक ३१.०७.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीत लष्करीबाग, प्लॉट नं. ३४, हिंगे किराणा जवळ, ठक्करवाडी, भांडेवाडी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी शुभम दुर्गादासजी भोंगाडे, वय ३० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह सुभाष नगर, पारडी येथे नातेवाईकांकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती १,०९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे पोउपनि. गंगाधर मुरकुटे ९४२२८२१६८० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बजाजनगर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३१.०७.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, फिर्यादी शिवानी ईश्वर लाखे, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. १३६, सद्भावना नगर, नंदनवन, नागपूर ह्या त्यांची मैत्रीण युगेश्री फुलबांधे, वय ३० वर्षे ह्यांचे सोबत त्यांचे टिव्हीएस ज्युपीटर मोपेड क्र. एम.एच. ४९ बि.जे. १०५९ ने पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत, चामडीया वस्ती, दंडीके ले—आऊट मैदानाजवळील गल्लीतुन जात असतांना, अचानक शंकर नगर गार्डनकडुन येणाऱ्या ह्युंदाई कार क्र. एम.एच. ४९ सि.डब्ल्यु. २०१९ चे चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोपेडला धडक दिल्याने, फिर्यादी गाडीसह खाली पडुन गंभीर जखमी व त्यांची मैत्रीण ह्या किरकोळ जखमी झाल्या. दोन्ही जखमींना उपचाराकरीता राऊत नर्सिंग होम येथे दाखल केले आहे. फिर्यादीचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि. पंकज बावणे ८३९०४५८४०१ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४,१७७ मो. वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**